बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी, नागपूर द्वारा संचालित

# भिवापूर महाविद्यालय,

भिवापूर जि. नागपूर

# "शाहिरी साहित्यः लावणी आणि पोवाडा"

## लघु शोध प्रबंध

**संशोधक विद्यार्थी**

बी.ए. .भाग-३ मराठीचे विद्यार्थी

**मार्गदर्शक**

**डॉ. मधुकर वि. नंदनवार**

मराठी विभागप्रमुख

**सत्रः- २०२२-२३**

बॅकवर्ड क्लास युथ रिलिफ कमिटी, नागपूर द्वारा संचालित

# भिवापूर महाविद्यालय,

भिवापूर जि. नागपूर

# "शाहिरी साहित्यः लावणी आणि पोवाडा"

## लघु शोध प्रबंध

**संशोधक विद्यार्थी**

बी.ए. .भाग-३ मराठीचे विद्यार्थी

**मार्गदर्शक**

**डॉ. मधुकर वि. नंदनवार**

मराठी विभागप्रमुख

**सत्रः- २०२२-२३**

## विद्यार्थ्यांचे प्रतिज्ञापत्र

बी.ए. भाग-३ सेमिस्टर VI चे आम्ही खालील विद्यार्थी या प्रतिज्ञापत्राद्वारे जाहीर करतो की, "शाहीरी साहित्य : लावणी आणि पोवाडा" या शिर्षकाअंतर्गत संशोधनपर व अध्ययनपर माहितीवर आधारित लघुशोधप्रबंध मराठी विभागाला सत्र २०२२-२०२३ करीता सादर केलेला असून हा लघुशोध प्रबंध आम्ही प्राध्यापक डॉ. मधुकर नंदनवार मराठी विभागप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केलेला आहे. असे आम्ही घोषित करतो की, प्रस्तुत लघुशोध प्रबंधातील माहीती सत्य असुन सदर विषयावरील लघुशोध प्रबंध आम्ही कुठेही सादर केलेला नाही.

ठिकाण: भिवापूर

दिनांक: ३०/०४/२०२३

### संशोधक विद्यार्थी

| | | | |
|---|---|---|---|
| १) पल्लवी आर. भोयर | : Bhoyar | ६) प्रलय पी. कालरकर | : Kalkar |
| २) आरती गोपीचंद महल्ले | : A.G. Mahalle | ७) जान्हवी आर. पिंपळकर | : J.R. Pimp |
| ३) लता ए. बागडे | : Bagade | ८) प्रकाश आर. पाटील | : P.R. Patil |
| ४) कोमल आर. डडमल | : Dudmal | ९) वैशाली डी. कारमोरे | : Vkarmore |
| ५) साहिन एस. शेख | : S.S. Shekh | १०) स्नेहल के. शेंडे | : S.Shende |

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

मी प्रमाणित करतो की "शाहीरी साहित्य : लावणी आणि पोवाडा" या शिर्षकाअंतर्गत मराठी विषयाच्या बी.ए. भाग-३ सेमिस्टर VI च्या विद्यार्थ्यांनी संशोधनपर व अध्ययनपर माहितीवर आधारित लघुशोधप्रबंध विद्यार्थ्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला असून . हा लघुशोधप्रबंध अभ्यासपूर्ण आहे याची मला खात्री आहे. प्रस्तुत विषयावर लघुशोधप्रबंध पूर्ण करून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या संशोधन कार्यात मोलाची भर टाकली आहे.

ठिकाण: भिवापूर

दिनांक: ३०/०४/२०२३

मार्गदर्शक

डॉ. मधुकर वि. नंदनवार

मराठी विभागप्रमुख

## प्राचार्याचे प्रमाणपत्र

मी प्रमाणित करतो की "शाहीरी साहित्य : लावणी आणि पोवाडा" या शिर्षकाअंतर्गत मराठी विषयाच्या बी.ए. भाग-३ सेमिस्टर VI च्या विद्यार्थ्यांनी संशोधनपर व अध्ययनपर माहितीवर आधारित लघुशोधप्रबंध प्रा. डॉ. मधुकर वि. नंदनवार मराठी विभागप्रमुख भिवापूर महाविद्यालय, भिवापूर यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण करून महाविद्यालयाच्या संशोधन कार्यामध्ये मोलाची भर टाकली आहे. प्रस्तुत अध्ययन विषयाचा अभ्यास स्वतंत्रपणे व तटस्थपणे करण्यात आलेला आहे. याचा मला पूर्ण विश्वास आहे.

दिनांक: ३०/०४/२०२३

प्राचार्य
डॉ. जोबी जॉर्ज

PRINCIPAL
Bhiwapur Mahavidyalaya
Bhiwapur, Dist. Nagpur

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शिर्षक |
|---|---|
| १. | शाहिरी साहित्य–लावणी व पोवाडा, प्रस्तावना |
| २. | शाहिरी साहित्यातील लावणीचे प्रकार, गण, गौळण. |
| ३. | शाहीरी काव्यातील सामाजिक लावणी |
| ४. | राष्ट्रीय स्तरावरील शाहिरी काव्य |
| ५. | राजकिय पक्ष व निवडणूका यांचे वर्णन असणारी हिंदी शाहिरी काव्य |
| ६. | सणांवर आधारलेली शाहिरी काव्यरचना |
| ७. | निसर्गावर आधारीत शाहिरी काव्यरचना |
| ८. | प्राचीन संताच्या जीवनावरील पोवाडा शाहिरी काव्य– संत गोरा कुंभार, तंट्या भिल्ल. |
| ९. | प्रासंगीक शाहिरी काव्य– |
| १०. | सैन्य किंवा लस्करी विषयावरील शाहिरी काव्य |
| ११. | सरांश व निष्कर्ष |
| १२ | संदर्भ ग्रंथ |
| १३ | छायाचित्रे– लावणी आणि पोवाडा |

# शाहिरी साहित्यः लावणी व पोवाडा

## प्रस्तावना

मराठी साहित्याचे दालन समृध्द व परिपूर्ण असून त्याची परंपरा प्रदिर्घ आहे. प्राचीन मराठी साहित्यापासून तर आधुनिक साहित्यापर्यंत अनेक प्रवाह मराठी साहित्यात आहेत. त्यात संत साहित्य, पंडिती साहित्य व शाहिरी साहित्य हे तीन प्रवाह अतिशय महत्वाचे आहेत. प्राचीन साहित्यात संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत नामदेव या संतानी अभंग, पदे, गौळणी यांची रचना करून साहित्य निर्मिती केली. पुढे मध्ययुगीन कालखंडात शाहिरी साहित्याने मराठी साहित्यात मोलाची भर घातली. शाहिरांनी आपल्या काव्य रचनेतून लोकांची मने रिजविली. शाहिर हे लोकांसाठी झिजले. लोकरंजनाबरोबर, लोकजागृती व लोकशिक्षण देण्यासाठी शाहिरांचा खूप मोठा वाटा आहे. अनंतफंदी, रामजोशी, होणाजी बाळा, छगनभाऊ, शाहिर परशराम, गंगु हैबती इत्यादी शहिरांनी शाहिरी काव्याची रचना केली. शाहिरांनी लोकनाटयासाठी लावण्या, पोवाडे,यांची रचना केली ते समाजमान्य व समाजप्रिय झाले. त्यांना इतिहासात मानाचे स्थान मिळाल्याचे दिसते.

शाहिरांनी रचलेल्या लावण्या, पोवाडे, तमाशातील सवाल जवाब, यांचा अभ्यास बी.ए. पदवी अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना आहे. संत साहित्य, पंडिती साहित्य व शाहिरी साहित्य या साहित्याचा अभ्यास विद्यार्थ्यांना करावा लागतो. बी. ए. तृतिय वर्ष ६वे सत्र च्या विद्यार्थ्यांसाठी होणाजी बाळा व राम जोशी या शाहिरांच्या लावण्या व पोवाडे, भूपाळी या काव्य प्रकारांचा अभ्यासक्रमात समाविष्ठ करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना शाहिरी साहित्याची जाणीव व्हावी त्यांना पुढील पदव्युत्तर एम.ए.च्या वर्गात मराठी लोकसाहित्यातील लोकनाटय, लोककला व लोकनृत्याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने शाहिरी साहित्य अत्यंत महत्वाचे आहे. हाच उद्देश पुढे ठेऊन व तसेच त्यांची संशोधक वृत्ती वाढीस लागावी म्हणून लघुशोध प्रकल्प सांगण्यात आला. त्यासाठी त्यांना शाहिरी साहित्यासबंधी माहिती गोळा करण्यास सांगण्यात आले. मराठी विषयाचे सहयोगी प्राध्यापक यांनी लोकसाहित्यातील लोकनाटय दंडार या विषयावरील आचार्य पदवीसाठी जे मौखिक व अलिखित साहित्याची माहिती व संकलन केले त्यांचे साहित्य विद्यार्थ्यांना देण्यात आले. व त्यांच्याही परीसरात असलेल्या अशा लावण्या, पोवाडे किंवा लोकगीत असतील त्यांचे साहित्य मागविण्यात आले. प्रचलित तसेच संग्रहित लोकगीतांचा आग्रह धरून ते मिळविण्यात आले. लोकसाहित्यातील लोकनाटय, लोकगीत, लोककथा यांचाही अभ्यासक्रम सांगण्यात आला. शाहिरांनी

रचलेल्या लावण्या, पोवाडे, ठुमरी, कुटप्रश्न, सवाल जबाब व लोकगीतांच्या अभ्यासाबध्दल माहिती देण्यात आली.

आधुनिक काळात ग्रामीण व नागरी भागात अनेक शाहीर निर्माण झाले. त्यांनी लोकांचे मनोरंजनाबरोबर लोकशिक्षणाचे कार्य केले. त्यासाठी शाहिरांनी ओक लोकनाटयात जसे तमाशा, दंडार, खडी गंमत, गोंधळ, भारुड, यासाठी लावण्या व पोवाडे तसेच इतर काव्यरचना करुन मराठी साहित्यात ते मैलाचा दगड ठरले. २०व्या शतकात ग्रामीण लोककवी व शाहिरांनी मराठीत लावण्या व पोवाडयांची रचना करुन समाजात एक आदर्श निर्मान केला आजच्या काळात ग्रामीण व शहरी लोककविंनी व शाहिरांनी रचलेल्या लावण्या व पोवाडे तमाशा, दंडार व खडी गंमत या प्रसिध्द लोकनाटयात गायिल्या जातात. हाच हेतू पुढे ठेऊन अशा गण,गौळण, लावण्या, पोवाडे व झडती इत्यादींचा आढावा या लघुशोध प्रकल्पाच्या निमित्ताने घेण्यात आला आहे.

# शाहिरी साहित्यातील लावणीचे प्रकार

ग्रामीण जनजिवनाचा धर्मविधी आणि लोकरंजनाचा एक महत्वाचा लोकनाट्य प्रकार आहे. लोकनाट्य सादर होतांना पूर्वरंगात गणला अतिशय महत्व आहे. योजलेले कार्य पूर्ण व्हावे, त्या कार्यात अडथळा किंवा अरिष्ठ येऊ नये. मंगलकार्य निर्विघ्न पार पडावे म्हणून कार्यारंभी वेगवेगळया देवदेवतांची पूजा त्याचे स्तवन करण्याची प्रथा प्राचीन आहे.

**गण—** नमन माझे गणराया रामराया राघोबाजी।।धृ।।
एकदंत चक्रभूजा सवे घेऊन सारजा।।
अजी सारजा ये रंगनी। सारजा ब्रम्हाची कुवरी।।
नारद तुंबर संगिता। रंगनी नाचे एकदंता।।

असे गणेशाला नमन केले जाते.

**गौळण :—** गणानंतर क्रमाणे येणारी गौळण ज्याप्रमाणे तमाशात येते त्याचप्रमाणे दंडारीतही अवतरते. गौळण म्हणजे जनसामान्यांच्या मनाचा ठाव घेणारे एक आकर्षक प्रकरण होय. गौळण परंपरागत असून मौखिक असते. गौळणीत प्रामुख्याने राधाकृष्णांची आंतरिक ओढ, श्रीकृष्णाचे मुरलीवादन, श्रीकृष्णाच्या रासक्रिडा, कृष्णाच्या लीला, गोपगोपींची व्याकुळता हा भाग येतो. लोकपरंपरागत गौळणीत भक्तीच्या उन्माद व राधाकृष्ण आणि गौळणी यांच्या रुपाचे वर्णन आढळते. उदा.

"सोड रे सोड वाट, नंदलाला, जाते मी बाई मथुरेला

तव मुरलीची मंजुळ धुन ही.

जाई अवघे हृदय भेदूनी

बावरी झाली राधा गौळण

वेडी करु नको मजला

सोड रे सोड वाट, नंदलाला, जाते मी मथुरेला"

अशा प्रकारे गौळणीचा उल्लेख करतात. गणानंतर गौळण हे पर्यायाने ठरलेले असते. गौळणीमध्ये नाट्य भरपूर असते. विशेषत: कृष्ण राधेचे प्रेम मिलन, संसारी राधा कृष्णाच्या मुरलीने भाळून जाणे. दह्या दुधाचा धंदा करण्यास गौळणी मथुरेला जाणे व कृष्णाने मध्येच त्यांची वाट अडवून ठेवणे इ भाग गौळणी मध्ये येतो.

प्राचीन व अर्वाचिन साहित्यात गण व गौळण या काव्याला फार महत्व आहे. संत ज्ञानेश्वरांच्या साहित्यात गौळण आलेली आहे. तसेच अर्वाचिन साहित्यात शाहिरांनी गौळण या काव्याला महत्व दिले आहे.संत साहित्यात व शाहिरी साहित्यात गौळण या काव्य रचनेचा अभ्यास करावा लागतो. त्यादृष्टिने गौळण हे शाहिरी काव्य महत्वाचे आहे.

## शाहीरी काव्यातील सामाजिक लावणी:-

शाहिरी काव्यात सामाजिक लावणीला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. विद्यार्थ्यांना अशा सामाजिक काव्य रचनेचा अभ्यास व्हावा या उद्देशाने हे शाहीरी काव्य देण्यात आले. "ज्या लावणीत सामाजिक स्तरावरील विषय, प्रसंग,घटना यांचे हुबेहुब चित्रण रेखाटलेले असते त्या लावणीला सामाजिक लावणी असे म्हणतात." इतर सर्व लावणी प्रकाराहून वेगळा व विस्तृत असा सामाजिक लावणी प्रकार होय. आपल्या सभोवताल पसरलेले अज्ञान, अंधश्रध्दा, दैन्य यांच्यावर आघात करण्याचे कार्य ही लावणी करताना दिसते.

सामाजिक लावणीतून एका निपुत्रिक विवाहितेची मनोव्यथा ग्रामिण लोककवी "वांझोटीची लावणी" या लावणीतून साकार करताना ग्रामिण कविच्या प्रगल्भ प्रतिभेचे दर्शन घडते-

पोटी पुत्र नाही वांझ किती दिवस राहू?

दैवात नाही माझ्या, बोल कोणावर ठेवू? ।टेक।।
मी नवस बहु केले, कोण्या देवाजवळ जाऊ?
नाही वत मला ग देव, जिव कशाला देऊ?
बारा महीने पत मी केली, औषधी किती मी घेऊ?।।१।।
तरी गर्भ राहेना, कोण्या वैद्यला पाहू?
सारा गाव वांझोटी म्हनते, कोठे पळून जाऊ?
आया माया खिजवती, लपून किती दिवस राहू?।।२।।
रंभा नाची आहे, एक वडील जाऊ
डुकराच्या पिला वाणी, गणपतीला पिले नऊ
का करती माझ्या दैवाला, हे माय, बाप भावू?।।३।।
जन्म गेला वाया, मग हे तोंड कशाला दावू?
पुढे उमेद आहे माझी, दुस—याचा घर काढून घेऊ?
विठोबा बापू गुनवान, मला समजी देते बहु।।४।।

या सामाजिक लावणीतून निपुत्रिक स्त्रीचे दुःख स्त्री समाजापुढे मांडते व तसा प्रश्न समाजापुढे साकार करताना आजच्या आधुनिक कवितेतून कविने जसा 'आई' हा विषय चिरंतन केला तसाच वांझोटिच्या लावणीतून शाहिरांनी साकार केला.

## राष्ट्रीय स्तरावरील शाहिरी काव्य:—

ईतिहासाचे महत्व व शिक्षणाचे महत्व विद्यार्थ्यांना कळावे यासाठी हे काव्य विद्यार्थ्यासाठी देण्यात आले. प्रकारात राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विषय सामाजिक प्रश्नाचे भान ठेवून साकार करते तिला राष्ट्रीय काव्य म्हणता येईल. कारण सामाजिक प्रश्न व राष्ट्रीय प्रश्नांची इतकी सरमिसळ झालेली आहे की, ते वेगळे करताच येत नाही. कुटुंबकल्याण,अंधश्रध्दा निर्मुलन, प्रौढशिक्षण,स्वच्छता अभियान,शेतकऱ्याच्या आत्महत्या तसेच राष्ट्रीय स्तरावरील वेगवेगळे राजकिय व राष्ट्रीय पक्ष इ. विषय ही राष्ट्रीय शाहिरी रचना स्पष्ट करते. हे शाहिरी काव्य अनेक राष्ट्रीय समस्याचे विवरण आपल्या श्रोत्यांसमोर ठेवले आहेत. प्रौढ शिक्षणावर रचलेली ही लावणी उदाहरणादाखल घेता येईल—

"दिडशे वर्ष भारतावर परके सरकार, गुलामगिरीचे

आता राज्य आले हाता लोकशाहीचे।टेक।।

तेव्हाची रुढी काही जाईना,

आता सोडाना, आंगठा देण्याचे

फसू नका आंगठा देऊन,कर्ज वाढाचे।।१।।

सावकार कर्ज देती,

आकडे वाढविती भरपाईचे

डोळे असून आंधळे नका राहू, शिका वाचण्याचे।।२।।

तुमचा मित्र कोठेही असला,

पत्ता त्याने दिला, भेट घेण्याचे

ओळख पाटी वाचता येईना, घात प्राण्याचे।३।।

प्रौढ शिक्षणाची पध्दती,

रात्री शिकविती दोन घंटयाचे

घ्या दहा महिण्यात,सर्व ज्ञानाचे।।४।।

**राजकिय पक्ष व निवडणूका यांचे वर्णन असणारे हिंदी शाहिरी काव्य–**

आजच्या राजकीय व राष्ट्रीय स्तरावरी या हिंदी शाहिरी काव्याचा अभ्यास विद्यार्थ्यासाठी महत्वाचा असल्याने या शाहिरी रचनेचा अंतर्भाव केला.

आया झुटे का जमाना भैया कैसा करना।

आया झुटे का जमाना भैया कैसा करना।।धृ।।

मज्जीदमे का काजीमुल्ला, देवल का पुजारी।

माला जपने छोड दिया है देखे नर नारी।

मन मे बसीयो काम ना भैया कैसा करना। आया झुटे....।।१।।

बहमन होके पुरान बाचे सबको बतावे ज्ञान।

घर घर मे पार्टी ऊडाले घर मे बुलावे मेजवान।

ये काग्रेस के मेंम्बर बनते करते लुचपत खोरी।

जिनके भरोसे चुनकर आये उनके गालेपर सुरी।

चिल्लर नोटो का जामाना भैया कैसे करना........।।२।।

औरत बहार सिनेमा देखे, मर्द पकाये रोटी।

हुवा पुण्य से काय सताया दुनिया बन गई झुटी।

नये नये पक्ष का निकलना भैया कैसे करना।। आया झुटे... ।३।।

विद्यार्थ्यासाठी या शाहिरी काव्यरचनेचा अभ्यास उपयुक्त असल्याने राजकीय परीस्थितीचे ज्वलंत चित्रण लोकशाहिर करतो यातून राजकारणाचे महत्व तसेच बदलते वास्तव चित्र स्पष्ट होते. आजच्या नव युगात मंदिर, मज्जीद सारख्या स्थानांनाही कलंक लावण्याचे काम पुजारी, मुल्लाने केल्याचे परिचीत आहेच. कॉंग्रेस सारख्या राष्ट्रीय पक्षातील हेवेदावे व वेगळया पक्षांची निर्मीती हे सर्वश्रृत असतांनी जे नेतेमंडळी नागरिकांच्या भरोश्यावर निवडून येतात त्यांनाच विसरतात ही ज्वलंत खंत लोककवी या राष्ट्रीय लावणीतून व्यक्त करतांना राजकारणी लोकांपासून सावध राहाण्याचा सल्लाही देतात. राजकीय पक्षाच्या अंतर्गत असणारे नेते अनेक नवीन नवीन पक्षाची निर्मिती करताना आजही दिसतात म्हणूनच लोकांचा राजकीय पक्षावरचा विश्वासही ऊडाल्याचे आजच्या परिस्थितीत शाहिर स्पष्ट करतात. हे वास्तव सत्य मानावे लागेल.

## सणांवर आधारलेली शाहिरी काव्यरचना –

तत्कालीन समाजाचे वास्तव स्थितीचे भान तथाकथीत लोकशाहीराला होते त्यानुसार समाजस्थितीचे भान ठेवून समाजाचे मार्गदर्शक या नात्याने लोकशाहीराने लावणी रचली.

सण शिमग्याचा आला नारीने शिनगार केला।।

घागर चुंबर घेवून सुंदर नार गेली पाण्याला।।

पण्याचे पाणघाटी नारीचा साजन मिळाला।।

लई दिवसाच्या भेटी हात काय लावे पदराला।।

हात लावता चोळी फाटली अंतघात केला।।

माझी सासू पुसेल काय मी सांगीन सासूला।।
सासू बसली अंगणा, सुनबाई उघडया अंगान।।
कालच घेतली नवखण चोळी फाटली कशानं।।
काय सांगू सासुबाई तुम्हाला चोळीचे गुण।।
पाण्याचे पाणघाटी रान हेल्याचे भांडण।।
मला पाडीले उबडी ग चोळी चिरली शिंगान।।
थोर तुमचे नशीब  सासु बाई आलो वाचून।।
सदाशिवाला नवस कबूल सिरन्या वाटानं।।
सन शिमग्याचा आला नारीने शिनगार केला।।
घागर चुंबर घेवून सुंदर नार गेली पाण्याला।।

समाजातील वास्तव स्थिती लोककवी वर्णन करतांना शिमग्याच्या सणाला नारीने श्रृंगार करुन विहरीवर पाणी भरायला जाणे व खुप दिवसांनी तिचा प्रियकर भेटणे व त्याच क्षणी त्याने त्या स्त्रिच्या पदराला हात लावून आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी चोळी फाडणे असे सांगताना सासुपूढे  सून उघडया अंगाने जाणे व सूनेने खोटे बोलून आपण रानहेल्याच्या भांडणात वाचलो ही शंकराची कृपा आहे तुम्ही नारळाचा प्रसाद वाटा असे सुनेने कबूल करुन सांगणे ही लावणी लोककवी समाजातील सासू सुनेमधील संभाषणातून रंगवितो. समाज वास्तवाचे भान विद्यार्थ्यांना या शाहिरी रचनेतून येते.

## निसर्गावर आधारीत शाहिरी काव्यरचना–

शाहिरांनी आपल्या काव्यात निसर्ग वर्णन करुन लावणीत निसर्ग ओतप्रोत भरलेला आहे. झाडीपट्टीचा निसर्ग 'नऊ लाख झाडी, बावन्न लाख वऱ्हाड' या लाकोक्तिवरुन स्पष्ट होतो. झाडीपट्टीतील विविध वृक्षांचे वर्णन करुन लोककविने सामाजिकतेबरोबर राष्ट्रीय ऐक्य जोपासल्याचे दिसते. भिवापूर सारख्या ग्रामीण भागाचा झाडीपट्टीसी निगडीत असल्याने संशोधक विद्यार्थ्यांनी ही काव्यरचना अधिक लाभकारक ठरल्याचे दिसते.

निंब म्हणे,निंबुनी, ऐक माझे उत्तर

करुया रांजीचे लग्न, अंजीर आहे वर

अन्यार म्हणे, येरुनी, निरोप धाडा केळीला,

सर्व वनस्पती मिळूनी तुम्ही लग्नाला चला।।१।।

लग्नाशी चालले व–हाडी, मोगरी की बाम्हण,

नाही मिळे बसाया जागा, गर्दी केली चिलाटीनं।।२।।

चिलाटी बसली येउन, मागे भाराटी आली,

हिवर बसला रुसून, बाभूळ बोलावया आली,

हिवर बसला रुसून, खैर पुसते त्याला,

पळस, पिंपळ,पापडा मागाहून धावत आला।।४।।

सेवंती म्हणे, सिंधी बाई, काहा बसलीसरुसून?

खारक म्हणे बदामाला, लग्न घेतला बिब्यानं।।५।।

सगूनची तारीफ केला, तू नवरदेव खासा,

येन म्हणे धावडयाला, तुम्ही पंगतीला बसा।।६।।

पंगत वाढली बासानं, रुई बोलली बदामाला,

असा गोंधळ होऊ लागला, कुडा बाले मोहाला।।७।।

झिलबुली ऐसी बोलली, बोर काहून नाही आली?

बोर झाली वरठीन, ते धुवा गेली।।८।।

कुकुडरांजी ऐसी बोलली, टेंभरुन नाही आली?

टेंभरुन नाही आली, ती बाळंतपणा गेली।।९।।

या शाहिरी काव्यात एक विवाह प्रसंग कल्पून त्याचे वर्णन आजच्या काव्य प्रकारास समकालीन असल्याचे वाटते. वरील लावणीत प्रत्येकजन कोणत्यातरी कामात मग्न असल्याने वनस्पतीच्या या विवाह सोहळयाला येण्यास ऊशीर करतो. जंगलात विविध जातीची वृक्ष वेली आढळतात. हया वृक्षवेलीशी ग्रामीण जनतेचे रोजचे संबंध येतात. त्यांचा सहवास व नित्याचे जंगलाशी असणारे नाते यामुळे ग्रामीण लोककविने जंगलातील वृक्षांच्या विवाह सोहळयाचे नाते समाजातील विवाहाशी जोडले. विविध जातीचे वृक्ष व समाजातील अनेक जातींचा संबंध दाखवून समाजासमोर एक आदर्श निर्मान करुन जातीभेदाची संकल्पना उलघडून दाखविल्याचे स्पष्ट होते. त्यातूनच सामाजीक समता प्रस्तापित व्हावी व निसर्गातील विविध वृक्षांची नावे माहिती मिळण्यासाठी ही शाहिरी रचना उपयुक्त ठरली. म्हणूनच लोककविनी आपल्या लावणीत ही रचना केली.

**प्राचीन संताच्या जीवनावरील पोवाडा शाहिरी साहित्य** — प्राचीन मराठी वांङ्‌मयाची सूरुवात संत साहित्याने होते. संतसाहित्य, पंडिती साहित्य व शाहिरी साहित्याच्या प्रवाहाने मराठीचे दालन समृध्द झाले आहे. तेराव्या शतकात संत ज्ञानेश्वराच्या वारकरी संप्रदायात अठरापगड जातीजमातीच्या लोकांनी एकत्र येऊन आदिभौतिक लोकशाही निर्माण केली. त्यात वारकरी संप्रदायातील संत गोराकुंभाराचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. यात संत गोरा कुंभाराची विठ्ठलावरील अगम्य भक्तिचे महात्म्य सिध्द करणारे कथाकाव्य उल्लेखनिय आहे. लघुशोध प्रकल्न मार्गदर्शकाकडे असलेल्या संत गोरा कुंभाराच्या अमुल्य भक्तीचे महात्म्य सांगणारे हे संपूर्ण कथाकाव्य निश्चितच आपल्याला सदैव प्रेरणादायी ठरेल.

**संत गोरा कुंभार:—** संत गोरा कुंभाराचे अमुल्य भक्तीचे महात्म्य वर्णन:—

**कडी पहिली—** जय श्रीहरी गोरा कुंभार। त्याच्या पुजेला अंत नाही फार।
वर्णितो कथा पोवाडयावर। साधू संताच्या।।
ज्याच्यासाठी सोडून पंढरी। देव श्रीहरी, करुन चाकरी,
गोरोबा घरी, घडवे घागरी, कच्च्या मातीच्या।।१।।जी— जी
पंढरपुर प्रगनेच्या शेजारी। होता एक डोकेगाव महाभारी।
तेथे हरीभक्त गोष्ट खरी। गोरा कुंभार।
करे कुंभाराचा धंदा, भजे गोविंदा, करुन आनंदा,
सुखी संसार हो या जी रे जी......
घरी पतिव्रता नार कामीना। पांडूरंगाची भक्ती दोघांना।

घरी एक बाळ लहानसा तान्हा। अती सुंदर।

अती छान सुरत बाळाची। चंद्रप्रभाची, दाही महीण्याची,

त्याची ऊमर हो या जीर...... दाजी रे जी.

कोणे एके सकाळच्या प्रहरी। टिकास पावळे घेवून खांदयावरी।

गोरा कुंभार माती उकरी। घराबाहेर।

त्याने माती खेदून भरभरा। भिजविला गारा।

अंगणी भरपूर हो या जीर ...दाजी रे...जी

माती भिजवून चिखल केला। गोरोबा माती तुडवू लागला।

मुखाने करुन हरी विठठल हरी विठठल।। जयजय कार।

लागले देवाचे ध्यान। विसरला भान नेत्र लाऊन।

नाचे चौफेर हो।। या जी रे दाजी रेजी.

त्याची नार गेली पाण्याशी। शामीच्या पाशी।

सोडून अंगणात लेकराला।।

गोरोबा होता ध्यानात। बाळ आला रांगत रांगत।

बाळ पाया खाली गेला हो जी.जी।।

नाही माहीत गोरोबाला, नाचु लागला।

भरभरा तुडविला गारा, हो जी.

देवाचे ध्यान होते त्याला, बाळ पायाखाली आला।

त्याने बाळ मातीत तुडविला हो या जीर दा जी रे जी.

या मातीबरोबर त्याने तुळविला बाळ, हो रामा।

झाला रक्तमासाचा चिखल लालबंबाळ हो रामा।

तितक्यात पाणी घेऊन आली वेल्हाळ हो रामा।

जोराने मारुन हाका रडे धडधड हो रामा।

तिने जोराने सोडला काहवा—धावा हो धावा— माझा भरतार वेडा झाला—१—

याची सुज्ञ गेली सारी— म्हणत हरी हरी —बाळ माझा मातीत तुडविला—२—

नरीचा ऐकून शोक धावती लोक— दोष देती गोरोबाला—

कोणी म्हणती विठ्ठला तो कधि— लागून याचे नादी— संसार याने बुडविला—-

**उडान—** असा कसा विठोबा देव— त्याला नाही कोणाची किव—

घेतला तान्ह्या बाळाचा जिव— गोष्टी लोकांच्या ...(ज्यांच्यासाठी)

**कडी दुसरी**— मग लोकांचा ऐकूनी गलबला— गोरा कुंभार भानावर आला—
हात जोडून म्हणे सर्वाला— विनवून म्हणे वाटेल ती शिक्षा द्या मला—
अन्याय म्या केला — नको देवाला— देऊ दोषण—१— नार क्रोधाने म्हणे पतीराजा—
करती तुम्ही विठ्ठलाची पुजा— कैसा संसार बुडविला माझा— तुमच्या देवानं—
केला माझ्या पुत्राचा घात— दाबून मातीत— तो पंढरीनाथ— केवळ पाशानं—२—
देवाची निंदा ऐकल्यावर— माराया धावला गोरा कुंभार—तेव्हा ती नार कापून थरथर—
बोले मोठयानं— नका हात लावू अंगाला— स्वामी तुम्हाला— तुमच्या विठ्ठलाची आनं—३—
ऐसे नारीचे ऐकूनी शब्द— तेव्हा गोरोब बोले आपला क्रोध—त्याने धरुन मनासी बोध—
आपल्या खुसीन—केला संसार सुखाचा त्याग—धरुन अनुराग—विषय सुख भोग—दूर करुन—४
ऐसे एकदोन वर्ष लोटता— स्वामीसी म्हणे पतीव्रता— तुम्ही संसार सोडला नाथा—
कशा कारणा तुम्ही मजसी अबोला केला— अशाने बोला— कसे आपल्याला— होईल संतान—५—

**चाल १ली**— गोरोबा म्हणे सुंदरी— गोष्ट आहे खरी— परंतू विचार कर पाहू—
व्यर्थ मला नको दोष देऊ—घातली शपथ देवाची— आठवण कर त्याची—
अंगाला हात कैसा लाऊ— शिरावर पाप कैसे घेऊ—आम्ही भक्त पांडूरंगाचे—
एका वचनाचे— आणिक काय तुला बोलून दाऊ— आपण भावाबहिणीसारखे राहू——

**चाल २री**— असी आपल्या स्वामीची एक निष्ठा पाहिली—१— मग घाई घाई आपल्या माहेरी गेली—२—सारी मात्या पित्याला हकिगत कळवली—३— पतीसाठी आपल्या बहिणीची मागणी केली—४—

**चाल १ली** — मग आपल्या पाटची बहिण— तिने मागूनं— लाविले लग्न स्वामीचे—
वरात आणली घरा— तेव्हा सासरा— मनं समजावे—जावयाचे—
मी दोन्ही कन्या आपल्या तुम्हासी दिल्या— दोन शब्द ऐका प्रमाचे—
दोघिवर सारखी प्रित— ठेवा दिनरात— दुर्जन भाव सोडून मनाचे——

**उडान**— तेव्हा सासऱ्याला म्हणे जावाई— मामाजी विचार करु नका काहि—
एक सारख्या पाहिन दोघिलाहि— कन्या मी तुमच्या—ज्याच्यासाठी———

**कडी ३ री**— घरासी वरात अल्यावर— केली रंगमहालि सेज सुंदर— पलंगावर निजला गोरा कुंभार—
गात हरी लिला— दोन्ही नारी बसल्या दोन्हीकडे सुंदर रुपडे— करुन पान विडे—देति स्वामीला—
पहून दोघ्या नारीची शोभा— आपल्या हाताला म्हणे गोरोबा— नका तुम्ही भूलू विषयाच्या लोभा—
पहून नारीला— नका ताईच्या अंगावर पडू— नेम नका सोडू— नाहितर तोडून टाकिन तुम्हाला—

दाखवून विषय सुखाचे चाळे– नार स्वामीच्या शेजारी लोळे– तरी गोरोबा ऊघडूनी डोळे–
पाहिना तिला– दोन्ही हात पोटासि धरून– मन आवरून– निजे दूर सरुन– भजे विठ्ठला–
असे काहि दिवस लोटल्या जाना– पतिला म्हणे वडील कामीना–श्शपथ वाहिली म्हणून मुनिंना–
**चाल २री** –दोघिने धरुन स्वामीचे दोन्ही हात–१– आपल्या छातीवर घेऊन निवांत–२–
तितक्यात जागा झाला गोरोबा संत–३– दोन्ही हात दोघ्या नारीच्या पाहून खाकेत–४–
तो तसाच दचकून उठला– म्हणे हाताला– तुम्ही वचन मोडले माझे–१–
कसी मला लागली झोप– केले यानी पाप– असे हात काय कामाचे–२–
मग कुऱ्हाड घेऊन हातात– ऐऊन रागात– केले तुकडे दोन्ही हाताचे–३–
पतिचे हात पाहून रडे कामिन– नाव घेऊन विठ्ठलाचे–४–
**उडान**– बाळ माझा मातिमध्ये तुडविला– पति हाताने थुटा केला–
कसी तुज दया नाहि रे विठ्ठला–(ना त्याच्यासाठी––ज्याच्यासाठी)
**कडी–४ थी**– गोरोबाने तोडले हात– दोघाहि नारी करती आकांत–
तरी तो आठवून पंढरीनाथा– बसला बिन घोर– घरी होती संपदा–हरी गोविंदा–
बुडला काम धंदा– आणि व्यापार–१– हाल बेहाल जिवाचे झाले– शेवटि व्दरि द्रव्याने गांजिले–
फाक्या वरफकि पडू लागले– वारंवार– नाहि वस्त्र अंगावर निट– चिंध्या चिरकूट– कुठले तेल मिठ– भाकरी वर–२– तेव्हा गोरोबाची कांता– हात जोडून विनवे भगवंता– कैसा रुसलासी पंढरीनाथा– धाव लवकर– कसी आमची येईना दया– तुला देवराया– तोडूनी माया– झालास निष्ठूर– तु भक्ताचा पूर्ण कैवारी– कीर्ती वर्णती पुराणापरी–३– धाऊन तसारले पांडवा घरी ध्रुपदी नार– दिल्या ध्रुपदिसी चार भूजा– कळला भाव तुजा– थुटा केला मांजा– भोळा भरतार–४– तुझे कोठे गेले देवपण– कसा मज विषई झाला पाशान– होईल अपकिर्ती तुझी अशानं– सर्व जगभर– सारे लोक करतील निंदा– तुझी गोविंदा– बुडवून धंदा केला याने थूटा– गोरा कुंभार–५–
चाल दुसरी– गोरोबाच्या नारीचा धावा– ऐकूनी तेव्हा–१– देव पंढरीसि जागा झाला– विठोबा म्हणे रुकमिणीला–२– माझा भक्त गोरा कुंभार– आवडता फार– आज मोठया संकटात पडला– त्याचा सारा काम धंदा बंडाला–३– आता कुंभारीनचे सोंग– घेऊनिया दोघं– ऐसे जाऊ त्याच्या गावाला– गोरा कुंभाराला तारायाला–४–
––– मग हाका मारुन गरुडाला म्हणे श्रीहरी–१– चाला रूप धरुन गाढवाचे गोरोबा घरी–२–
तेव्हा गरुड म्हणे भगवंता गोष्ट नाही बरी–३–आता नको नकोरे देवा तुझी चाकरी–४–
––– मी राजा सर्व पक्ष्यांचा– उच्च जातीचा– निच गाएव कैसा होऊ–१– मी तेत्तिस कोटि देव आणि दानव– रनात जिंकले बहू–२– निच कुंभाराच्या जातिचे– ओझे मातिचे– काहि

आपल्या पाठीवर वाहू–३– त्या गोरोबाच्या घरी– करुन चाकरी– अपमान किर्ती मी पाहू–

**कडी ५ वी–** बरोबर घेऊन दोघ्याहि नारी– गोरोबा आला पंढरपूरी– ऐऊन बैसला राज दरबारी– विठ्ठलाच्या– ( त्याच्यासाठी सोडून पंढरी) मातीच्या बनवू लागला घागरी– सर्व नाही टिकली– घागर माझी फुटली– तुम्हाला दुसरी देईन बदलून–१– मातीच्या पक्क्या पाहूण घागरी– अचंबा करिती सर्व नरनारी–२– गाडगे मडके नेई घरी मोल देऊन– जोराचा चालला धंदा– देवाने ऐंदा– धन संपदा– मिळविला मान–३– लोक म्हणती हा कारागिर जूना– दिसतो अकलेचा चतूर शाहाना– घागरीवर काढल्या खुना– कोरुन शंक, चक्र, पदफम आणि गधा– दाविती अदा– झाले जन फिदा– गेले मोहून– ऐकूणी गोरोबाची किर्ती– दूर दूरचे गिराईक येती– गाडगे मडके खरेदून नेती– बाजारातून– असी किर्ती गेली दूरवरी– त्या अवसरी– पंढरपूरी मचली गूण गूण–४– तेथे जन लोक येती दर्शना– त्याला देवळात देव दिसेना– सावता माहयाने ओकळखलया खुणा– मडके पाहून– म्हणे येथे कोठले हरी– सोडून पंढरी गोरोबाघरी– भगवान–

– जनाबाई, नामदेव भक्त– स्वामी एकनाथ,रोहिदास चोखामेळा– सर्वहि संत झाले गोळा–१– आली संत मंडळी सारी– म्हणत हरी हरी–२– विचारपूस करिती गोरोबाला– दाखवा विठू कुंभाराला– तुम्ही कैसे गोरोबा संत– आपल्या घरात– पंढरीनाथ लपविला– लावले मडके घडावयाला–३–

**चाल २री** –असे ऐकून गोरोबाला सुचेना काहि १–तो विठ्ठल विठ्ठल म्हणून बोलावून पाहि–२ साऱ्या संताचा गलबला पाहून त्या ठाई–३– गरुडासहित गुप्त झाले विठ्ठल रखूमाई–४–

– साऱ्या साधू संताच्या पूढे– धडा धडा रडे– तो हरीभक्त कुंभार–१– कैसी भ्रांती पडली मला– नाही ओळखिला– विठ्ठल रुखमिनी वर–२– चार दिवस नौकरा परी– आपले घरी– म्या राबविला इस्वर–३– आता जाऊन पंढरपुरी– त्याच्या दरबारी– क्षमा मागून जोडूनी कर–४–

**उडान**– बरोबर घेऊन दोघ्याहि नारी– गोरोबा आला पंढरपुरी–

ऐऊन बैसला राज दरबारी– विठ्ठलाच्या– ( त्याच्यासाठी सोडून पंढरी......)

**कडी ६ वी–** श्रीहरी चरणी ठेऊनी सार– देवाला विनवे गोरा कुंभार– थोर मजवरी ठेवले उपकार– अंत नाही त्याला– कष्टली रुकमीनी माता– पाणी वाहता– माती तुडविता गरुड थकला–१– पूर्व जन्माचा बहू पातकी– मला नाही पडली तुझी ओळखी– झाली माझ्या हाताने चुकी– क्षमा कर मला– विनंत्या नाना परिच्या– करुनी विठ्ठलाच्या नामदेवाच्या– किर्तनात गेला–२– तेथे दूरदूरच्या संत मंडळया– वाजविती टाळ मंजुळा आपल्या– कोणी हाताने वाजवून टाळया– म्हणून विठ्ठला– करिती नामाचा गजर– ते वारंवार– गोरा कुंभार– त्यात बैसला–३–

गोरोबाला नव्हते हात आणि बोटे— तरी अक्षणात आणूनी मोटे— हातावर हात मारुनी थोटे— नाचू लागला— असे नामदेवान पाहून— मनात पस्ताऊन— हरी गुण गाऊन— विनवी देवाला—४— देवा तू भक्तांचा कैवारी— तारीले भक्त नानापरी— आमच्या भक्त गोरा कुंभारा वरपि— का निष्ठुर झाला— किती दिवस ठेवसि थुटा— विचार कर माठा— लागेल आता बटा— तुझ्या नावाला—५— दया मग आली पंढरीराया— देवाने कैसी टाकली माया—दिली सुंदर बनवून काया— त्या गोरोबाला— दिले दोन्ही हात— मनगट— करोनिया निट— उणे नाही कोठ— दाहाही बोटे शोभती त्याला—६—

**चाल २री—** एका एका पटले — नवल वाटले— आले मग घरा आनंदाचे— गोरोबा टाळी पिटून नाचे—१—

त्यावेळी दोघ्याहि नारी— देव दरबारी— धरुनिया चरण विठ्ठलाचे— झाले मग मस्त मन त्याचे—२—
बोलती विठ्ठल रखुमाई— मागून घ्या काहि— दिले हात गोरोबाचे— तसे बाळ द्यावे आमचे—३—
—तेव्हा बोले पंढरीनाथ बायांनो ऐका—१— बाळाचे नाव घेऊनी मारुण पाहा हाका—२—
म्हणती गोरोबाच्या नारी येई बालका—३— तेव्हा पाच वर्षाचा बाळ— अति लाडका—४—

**चाल ३री** —तेव्हा सर्व साधु संतानं— मोठया गजरानं— केला तयाचा जयजयकार—१—
सांगे गोरोबाच्या कानी— विठ्ठल रुखमिनी— मस्तकी ठेऊनी कर—२—
आंगात शचप्र करूनी मोकळी— जाऊनी घरी— सुखाने करे संसार—३—
मग गात हरीची लिला— घरासी चाला— हरी भक्त गोरा कुंभार—४—
म्हणे नागोराव गुणीवान— मारोती बावानं—त्याची लिला अपरंपार—५—
कवि सदाशिव लक्ष्मण— रंग सभेत गावे गर्जून— डफावर कलगीचे निशान—
शौक गाण्याचा— गावे नारायण रघुनाथ— भाऊराव त्यात—मेळ प्रख्यात—गाडी खाण्याचा—
(—ज्याच्यासाठी सोडून पंढरी— देव श्रीहरी—करुन चाकरी—
गोरोबा घरी— घडवे घागरी— कच्च्या मातीच्या—)

संत गोरा कुंभाराच्या परमेश्वरावरील भक्तीभावाची प्रचिती आणून देणारी कथा पोवाडयाच्या व्द्वारे लोकशाहिर ऐकवित असताना ग्रामीण प्रेक्षकांच्या डोळयांत पाणी आल्याशिवाय राहात नाही. एवढेच नव्हे तर गोरा कुंभाराच्या जिवनाची, त्याच्या पारमार्थिक अधिकाराची व परमेश्वरावर असणाऱ्या अफाट भक्तिची कल्पना आल्याशिवाय राहात नाही. शाहीर गाडी खाण यांनी रचलेले हे काव्ये पंढरीच्या पांडुरंगावरील संत गोरा कुंभाराच्या उत्कट भक्तीचे महात्म्य निश्चितच आपली परमेश्वर भक्तीची ओढ वाढविते. या धार्मिक पोवड्यातून विद्यार्थ्यांना संत गोरा कुंभाराच्या ज्ञान आणि भक्ती या गुणांचा परिचय करून घेतल्याचे निदर्शनास येते. ही पोवाड्याची रचना ज्ञान आणि भक्तिचे महात्म्य विशद करणारी आहे.

**तंट्या भिल्लाच्या पराक्रमाचा पोवाडा काव्य प्रकार** — शूर मर्दाचा पोवाछा शूर मर्दानी गावा' असे शाहिर सांगत असताना तंट्या भिल्लाच्या पराक्रमाचे वर्णन लोकशाहिर पोवाडयातून रसिकांपुढे कथन करताना तंट्या भिल्लानी शंकराला प्रसन्न करुन घेण्यासाठी केलेली भक्ती, शिवशंभूने दिलेले वरदान, तंट्याचे काळभैरवाला व सर्व देवांना सिध्द करणे यातून ग्रामीण प्रेक्षकांना तंट्या भिल्लाच्या भंक्तिची ओढ व केलेली आराधना कळते.

तंट्या भिल्लाचा पोवाडा खालीलप्रमाणे—

ईलाका खंडवा शहर गुलजार ।

तेथे तंटया भिल्ल सरदार,भिल्ल जातीचा.

तुम्ही ऐका समाचार तंटया भिल्लाचा गा.या जीर.. जी

तंटया अरण्यात जाऊन,सदाशीवाची भक्ती करुन

प्रसन्न केले पंचवदन, पहा तंटयान ।

त्या सदाशिवाने त्याशि दिले वरदान गा या जिर दाजी रे ।।२।।
शिवाचा वरदान घेऊन, तंटया चाले जंगलातुन ।
कटक बंगण्यात जाऊन, गुरु कडून, गुरु कडून ।
नाना परिची विधा शिकला, तो संपुर्ण गा या जिर दाजी रे जी
तंटया आपल्या घराशी येऊन, काळ भैरव सिध्द करुन ।
पुजा देऊन, पुजा देऊन, या सर्व देवाला सिध्द केले ।
पहा तंटयान या दिर दाजी रे जी जी
नर्मदा गंगेवर जाऊन। पाच वेळा स्नान करुन। मंत्र पढून,
मंत्र पढून, त्या दिवशी होते सूर्याला ग्रहन गा या जीर दाजी रे जी.

चाल बदल—

गावोगावी डाके पाडूच लागला हो जी साजना जी
त्याने आठ सोबती बरोबरीन केला हो जी हो
तंटयाचा धाक मग सर्वावा पडला हो जी हो.

उडान— लुटले भले भले महाजन,पाटील, पांडे,सगळे जन,
ढीग पैशाचा, ढीग द्रव्याचा,
तुम्ही ऐका समाचार तंटया भिल्लाचा हो जी
या जीर दाजी रे जी

परमेश्वराला तंटयाने प्रसंन्न करुन घेतल्यावर त्यांनी गावोगावी आपल्या आठ सोबत्याच्या बरोबरीने डाके पाडण्याचे काम केले. तंटयाची दहशत सर्वत्र पडली तंटयाने पाटील, पांडे, महाजन व श्रीमंताना लूटून पैसा व द्रव्याचा संचय केला. हे काव्य आदिवासींना आजही प्रेरणा देणारे काव्य आहे. ह्या पोवाडा शाहिरी साहित्यातून निश्चितच प्रेरणा मिळते.

**प्रासंगीक शाहिरी काव्य–** ग्रामीण भागातील लोकांना आवडलेली ही लावणी संशोधक विद्यार्थ्यांना प्रकल्पाचे कार्य करता मिळाली. या लावणी प्रकारात नाचतांना एकच चाल घेवून नाच केला जातो. या नाचातील गायल्या जाणाऱ्या लावणीला 'परसंगी किंवा प्रसंगी लावणी'' असे म्हणतात. या लावणी प्रकारात परसंगी (प्रसंगी) नाच केला जातो.

या दोपहराच्या अमलात साजन सख्या बाई आला।

फेकला घरावर दगड इसारा केला

मी निजली होती मंदेरी चेव मजशी आला।

उघडला दाराची कडी धरीला पदराला

उडविला इस्काची लहेर आनंद झाला।

घडघडी येवूनी पलंगावर टसन लाविला

या भलत्याच गोष्टीसाठी मेल्या मरता

आजपासून सख्या, मी जोडीतो हात।

सोडीला चोळीची गाठ झाला बोंभाट

इस्काची चटक लागली होती नारीला।

प्रसंगानूसार या लावणीला शाहिरी काव्यात महत्व दिले गेले आहे.

**सैन्य किंवा लस्करी लावणी:–** शृंगारिक लावणीचा दुसरा प्रकार 'लस्करी' लावणी म्हणुन विशेष प्रचलीत आहे.'लस्कर' म्हणजे सैन्य या लावणी प्रकाराचा बोध होतो.एखादया स्त्रीचाप्रियकर किंवा जीवलग लस्करात किंवा सैन्याात गेला असताना त्याच्या विरहात तळमळणा–या प्रेयसीची आतुरता ज्या लावणीत वर्णन केलेली असते तीला लस्करी लावणी म्हणतात.

पती गेले लस्करात माझे परदेशा बाई।

रात्र जाते वैऱ्याशीन मजला झोप येत नाही।

सुकला सर्व बाग बगीचा सुकली जाई जुई।

सुकला सर्व फुल बगीचा स्वास येत नाही।

बालपणामध्ये लग्न केला आईबापानं।

आजवरी होते लहान मजला कळत नव्हते ज्ञान।

लवकर पाठवा पत्र पतीला आणा बोलावून।

अशा गं वाणी चौघे शिपाई आले चालून।

पती गेले लस्करात माझे परदेशा बाई।। या लावणीत लस्करात गेलेल्या पतीच्या विरहामुळे नवयुवतीला झोप न येणे व येणारी प्रत्येक रात्र वैऱ्यासारखी वाटणे सहज शक्य आहे. एवढेच नव्हे तर लोककविंनी समाजाच्या तत्कालीन समस्येवर नेमके बोट ठेऊन समाजशिक्षकाची भूमिकाही स्विकारल्याचे दिसते.बालवयात आईवडीलांनी मुलीचे लग्न केल्यामुळे कोणतेही संसाराचे ज्ञान व जाणीव नसलेल्या मुलीच्या पतीला परत बोलावण्याचा विरह,त्यात अचानक चार शिपाई येणे, पतीच्या मरणाची बातमी सांगणे व मुलीला वैधव्य येणे ही समाजाला लोककविनी सांगीतलेली कर्मकथाच. या ग्रामीण लोककविनी रचलेल्या लावणीतून सामाजिक भानाबरोबरच राष्ट्रियत्वाची जाणीव स्पष्ट होते. त्यामुळे अशा लावण्या राष्ट्रीय स्तरावर उपयुक्त वाटतात.

अशा प्रकारे शाहिरी साहित्यातून लावणी व पोवाडा या काव्याचे अनेकविध प्रकार दिसून येतात. या लघु शोधप्रकल्पात मोजक्याच लावणी व पोवाड्याची माहिती अंतर्भूत केली आहे.

**सारांश—** शाहिरी साहित्यात संत साहित्य, पंडिती साहित्य व शाहिरी साहित्य हे तीन प्रवाह अतिशय महत्वाचे माणले गेले. संतानी भक्तिला प्राधान्य दिले. तर शाहिरांनी लोकरंजनाबरोबर लोकशिक्षणाचे धडे दिले. म्हणूनच शाहीर हे प्रसिध्द झाले. शाहिरांनी आपल्यातील जनतेला आपलेसे करण्यासाठी प्रचलित असे दाखले, प्रसंग, घटनांची नोंद करून ते समाजापुढे शाहिरी साहित्यात आपल्या लेखनिच्या आधारे स्पष्ट केले. एवढेच नव्हे तर शाहीर हे लोकांमध्ये मिसळून लोकांच्या भावना लोकांना त्यांच्याच शब्दात मांडण्याचे कार्य केले. शाहीर समाजासी एकरूप झाले. शाहीरांचे बोल त्यांच्या वाणीतून प्रकट होण्यासाठी शाहिरांनी लावण्या, पोवाडे व गीते रचून समाजापूढे आदर्श निर्माण केला. शाहिरी साहित्याचा प्रवाह आजही वाहत आहे. १६व्या शतकात शाहिरांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली व मराठीचे दालन समृध्द केले. म्हणूनच 'शाहिरी काव्याला मराठीची प्रभात म्हणतात' हे अगदी खरे आहे. २०व्या शतकातील शाहिरांनी आपल्या काव्यात पौराणिक कथा, संताचे कार्य, आध्यात्मिक लावण्या, इंग्रजांच्या सुधारणा, संत गोरा कुभार, तंट्या भिल्ल, सामाजिक, राजकीय, चालू घडामोडींवर आधारित तसेच पर्यावरण व विज्ञान यावर आधारित लावण्या व पोवाडे रचून आपली शाहिरी परंपरा टिकवून ठेवली आहे. शाहिरांचे मराठी साहित्याला दिलेले योगदान शाहिरी साहित्याच्या दृष्टिने अत्यंत महत्वपूर्ण आहे. म्हणूनच शाहिरी साहित्याची विद्यार्थ्यांना माहिती मिळावी त्यांचे शाहिरी साहित्याविषयीचे ज्ञान वृदिंगत व्हावे पुढील अध्ययनात विद्यार्थ्यांना शाहिरी साहित्यात संशोधन करण्याची आवड निर्माण व्हावी या हेतून लघुशोध प्रकल्पासाठी 'शाहिरी साहित्यः लावणी व पोवाडा' हा विषय घेण्यात येऊन लघुशोध प्रकल्प पूर्ण झाला.

**निष्कर्ष—** शाहिरी साहित्यातील लावणी व पावोडा या दोन प्रकारातून शाहिरांच्या मराठीला दिलेल्या योगदानाचे महत्व कळून आले. विद्यार्थ्यांच्या संशोधन कार्यातून शाहिरी साहित्याबध्द्ल आलेले निष्कर्ष खलीलप्रमाणे आहेत.

१. शाहिरी साहित्यातील लावणी, पोवाडा इ. काव्य प्रकारांची माहिती मिळाली.
२. शाहिरांच्या मराठी साहित्याला दिलेल्या काव्याचे योगदान समजून आले.
३. शाहिरी साहित्याचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांना संधी प्राप्त होऊन विद्यार्थ्यांना संशोधन कार्यात चालना मिळाली.
४. शाहिरांनी लिहिलेल्या शाहिरी साहित्यातून सामाजिक व राष्ट्रीयत्वाचे महत्व जाणून घेण्यात आले.
५. शाहिरांच्या शाहिरी काव्यातील उपदेश व केलेल्या कार्यातून लोकजागृती व लोकशिक्षण यांचे महत्व निश्चितच आहे.

६. शाहिरी साहित्याचा प्राचीन ते अर्वाचिन असा प्रवास समजण्यास मदत झाली.
७. विद्यार्थ्यांना लोकगीतांची माहिती घेताना लावणी व पोवाडा यांच्यातील वेगळेपणा दिसून आला.

या लघु शोधप्रकल्पासाठी खालील संदर्भ ग्रंथाचा आधार घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी संदर्भ ग्रंथाच्या आधारे माहिती मिळवून ग्रंथ व पुस्तकातील शाहिरी साहित्याच्या आधारे प्रस्तुत लघु शोधप्रबंध साकार करण्यात आला.

## संदर्भ ग्रंथ सूची–


१) कालभूत पुरुषोत्तम, लोकनाट्य, उद्‌गम आणि विकास, विजय प्रकाशन हनुमान गल्ली, नागपूर, प्रथमावृत्ती. १९९७

२) बोरकर हरिश्चंद्र, झाडीपट्टीची दंडार, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे, प्रथमावृत्ती. १९९९

३) बोरकर हरिश्चंद्र, दंडारीची लोकसंपदा, तारा प्रकाशन साकोली, प्रथमावृत्ती. २००९

४) वाकोडे मधुकर, लोकप्रतिमा आणि लोकतत्वे, लोकवाङ्‌मय गृह मुंबई, प्रथमावृत्ती. १९९४

५) शेंडे ना. रा, लोकसाहित्य संपदा, विदर्भ साहित्य मंडळ, नागपूर, प्रथमावृत्ती. १९६४,

६) नंदनवार मधुकर, भंडारा जिल्हयातील लोकनाट्य दंडार, राघव पब्लिकेशन, नागपूर,२०१६

७) लांजे हिरामण, महाराष्ट्राची लोकनृत्य नाट्यधारा, विवेक प्रकाशन, शिवाजी नगर, नागपूर, प्रथमावृत्ती. २०००,



शाहिरी साहित्य – लावणी सादर करताना  कलावंत



शाहिरी साहित्य – लावणी सादर करताना  कलावंत



शाहिरी साहित्य – पोवाडा काव्य गायन




शाहिरी साहित्य– पोवाडा काव्य गायन